# <u>नियमित दिवाणी दावा क्र.१८५/२०२० मधील अर्ज नि.क्र.२३ वरील आदेश</u>

<u>CNRMHSN06002063-2020</u>

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र .९ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेकरीता झालेला विलंब माफ होवुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादीचा अर्ज वाचला. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादीच्या अर्जामधील कथन असे की, प्रस्तुतचे काम वादीने प्रतिवादी विरुध्द दावा मिळकतीमधील हिस्सा तुटक वाटप होवुन मिळावा म्हणुन दाखल केला आहे . प्रतिवादी क्र.९ ही दिनांक ०२/०१/२०२० रोजी मयत झालेली आहे. वारस नोंद करणेबाबत वादीने दिलेल्या अर्जास सुमारे १ वर्षे ८ महिने एवढा उशीर झालेला आहे. कोव्हीड–१९ च्या प्रादुर्भावामुळे कोर्ट कामकाज बंद होते. त्यामुळे पक्षकारांना वकीलांशी संपर्क साधुन माहिती देता आली नाही . वादीने वारस रेकॉर्डवर घेणेस जाणीवपुर्वक विलंब केलेला नसल्याने सदरचा विलंब माफ करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने सदर अर्जास म्हणणे दिले आहे . त्यांच्या म्हणण्यानुसार वादीचा अर्ज मान्य व कबुल नाही. प्रतिवादी नं.२ ह्या दावा दाखल होणेपुर्वी मयत असलेचे दिसते.

४. अर्जामधील कथने वादीने शपथेवर सांगितलेली आहेत. वारस रेकॉर्डवर आणण्यासाठी ९० दिवसांपेक्षा जास्त विलंब झालेला आहे . सदरचा विलंब हा कोव्हीड–१९ च्या प्रादुर्भावामुळे वादींना वकीलांशी भेटुन योग्य ती माहिती देता आली नसल्यामुळे झाल्याचे दिसते. दावा हा तुटक वाटप होवुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरचे कारण हे संयुक्तिक वाटते. प्रतिवादी क्र.९ यांचे वारस रेकॉर्डवर आल्यास प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही. वारस रेकॉर्डवर आल्यास दाव्याचा अंतिम गुणदोषावर न्यायनिर्णय देण्यास मदत होणार आहे. नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून वादीस वारस रेकॉर्डवर घेण्याची संधी देणे आवश्यक वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे

आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

अर्ज मंजुर करण्यात येतो.

**सही/-**

मिरज. **( स्वाती भा. नाईकनवरे-गरड )**

दि. ०७/०१/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | S. K. Jadhav, Grade-3 |
| Court. | : | Jt. Civil Judge,Jr.Dn.,Miraj |
| Date. | : | 07.01.2022. |
| Order signed by<br>the Presiding Officer on. | : | 07.01.2022. |
| Order uploaded on. | : | 07.01.2022. |